# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/३१३/२०१०/४०

तक्रार दाखल दिनांक :- **२२/११/२०१०**
निकाल दिनांक :- **१३/०१/२०११**

श्री शेख अल्ली अहेमद शे.अहेमद,
मुज्जाफर नगर,एन.१३,हडको,
औरंगाबाद.

(ग्राहक क्र.४९००११४००८५७) अर्जदार/ग्राहक

विरुध्द

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत शहर विभाग औरंगाबाद.

गैरअर्जदार

| | | |
|---|---|---|
| कोरम | व्ही.बी.मंत्री | अध्यक्ष |
| | प्रदीप. अ. सगणे | सदस्यसचिव |
| | विलासचंद्र सु. काबरा | सदस्य |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे.अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक २२/११/२०१० रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता (प्रशासन) व नोडल अधिकारी,औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ०७/१२/२०१० रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने महावितरण कंपनीकडुन पीठाच्या गीरणी करीता १० अश्वशक्ती भाराचा वीज पुरवठा घेतला आहे त्याचा ग्राहक क्रमांक ४९००११४००८५७ असा आहे. ग्राहकाने वीज मीटर नादुरुस्त झाल्यामुळे त्यामधील मीटर वाचन वाचता येत नाही व मीटर बदली करण्याबाबत महावितरण कंपनीकडे दिनांक १३/०२/२००९ पासुन एकुण ७ लेखी तक्रारी दाखल केल्या आहेत परंतु त्याचे नादुस्त मीटर बदली करण्यात आले नाही. ग्राहकास माहे ऑगस्ट २०१० मध्ये ३५४४ युनिट वीज वापर दाखवुन रुपये १८८८६/- एवढे अवास्तव वीज देयक देण्यात आले. त्याबाबत सुध्दा ग्राहकाने महावितरण कंपनीकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. त्याचे तक्रारी नुसार कंपनीने दिनांक १६/११/२०१० रोजी मीटर बदली करुन दिले परंतु वरील अवास्तव वीज बिल दुरुस्त करुन दिले नाही. ग्राहकाने त्याचा सरासरी वीज वापर २५० ते २६० युनिट असल्याचे नमुद केले आहे. त्यांनी मंचात तक्रार दाखल करुन माहे ऑगस्ट २०१० चे वीज देयक रद्द करुन पुर्वीच्या सरासरीच्या नुसार वीज देंयक देण्यात यावे व झालेल्या मानसिक त्रासापोटी रुपये ५००/- नुकसान भरपाई मीळवुन देण्याची विनंती केली आहे.

२) वरील तक्रारीची सुनावणी दिनांक ०७/१२/२०१० रोजी घेण्यात आली. सुनावणीच्या दरम्यान वीज ग्राहक उपस्थित होते परंतु नोडल अधिकारी गैरहजर होते तसेच महावितरण कंपनीतर्फे ग्राहकाच्या तक्रारीवर जबाब सादर करण्यात आला नाही त्यामुळे सुनावणीची पुढील तारीख २१/१२/२०१० रोजी ठेवण्यात आली.

३) दिनांक २१/१२/२०१० रोजी झालेल्या सुनावणीस वीज ग्राहक व कंपनीतर्फे श्री एन.डी.भाले सहाय्यक लेखापाल उपस्थित होते.त्यानी ग्राहकाच्या तक्रारीवर जबाब व ग्राहकाचे सी.पी.एल.,वीज बिल दुरुस्ती प्रस्ताव,मीटर बदली अहवालची प्रत व कनिष्ठ अभियंता यांचा स्थळ निरिक्षण अहवाल सादर केला. दोन्ही बाजुचे म्हणने ऐकुण घेतल्यानंतर प्रकरण निकासाठी ठेवण्यात आले.

४) दोन्ही बाजुकडुन दाखल झालेल्या कागद पत्रावरुन असे दिसुन येते की, ग्राहकाचे मीटर नादुरुस्त झाल्यामुळे त्यावरील वाचन दिसुन येते नव्हते त्याबाबत ग्राहकाने फेब्रुवारी २००९ पासुन सातत्याने लेखी तक्रारी दाखल करुन मीटर बदली करण्याबाबत महावितरण कंपनीस विनंती केलेली आहे परंतु त्यांचे मीटर बदली करण्यात आले नाही. माहे ऑगस्ट २०१० मध्ये ग्राहकास ३५४४ युनिट वीज वापर दाखवुन १८५६०.६१/-रुपयाचे वीज देयक देण्यात आल्याचे दिसुन येते.ग्राहकाने वरील अवास्तव वीज देयकाबाबत तक्रार केल्यानंतर दिनांक १६/११/२०१० रोजी त्यांचे मीटर बदली करुन देण्यात आले. मीटर बदली अहवालावर कनिष्ठ अभियंता यांनी मीटरचे रिडींग दिसत नसल्याबाबत ( नो डिसप्ले ) नोंद केली आहे. तसेच ग्राहकाचा सरासरी वीज वापर ३५० युनिट प्रति महा असल्याचे नमुद केले आहे. महावितरण कंपनीतर्फे सादर करण्यात आलेल्या वीज बिल दुरुस्ती प्रस्तावाचे निरिक्षण केले असता असे दिसुन येते की,त्यांनी ग्राहकाचा वीज वापर ७८३ युनिट प्रति महा गृहीत धरुन माहे ऑगस्ट, सप्टेबर व ऑक्टोबर २०१० करीता वीज बिल दुरुस्ती करुन ६०७०.२३/-रुपयाची वजावट दाखविण्यात आली. वरील आकारणी करतांना ग्राहकाचा

वीज वापर दररोज ७ तास होत असल्याचे गृहीत धरण्यात आले.ग्राहकाने त्याची पीठ गीरणी दररोज ४ तास चालत असल्याचे सांगुन त्यांना प्रति महा २५० ते २६० युनिट वीज वापराचे देयक आज पर्यंत प्राप्त झाल्याचे नमुद केले.सी.पी.एल.चे निरीक्षण केल्यानंतर माहे ऑगस्ट २००९ ते जुलै २०१० या १२ महीण्याचे कालावधीत ग्राहकाचा वीज वापर सरासरी ३०५ युनिट प्रति माह झालेला दिसुन येत आहे. ग्राहकाचे नादुरुस्त मीटर दिनांक १६/११/२०१० रोजी बदली करण्यात आले व त्या ठिकाणी १७९२२१ क्रमांकाचे नवे मीटर बसविण्यात आले. कनिष्ठ अभियंता यांनी दिनांक ०२/१२/२०१० रोजी घेतलेल्या स्थळ निरिक्षण अहवाला नुसार वरील मीटरचे वाचन १११ युनिट असल्याची नोंद केली आहे. यावरुन नविन मीटरनुसार ( १६/११/२०१० ते ०२/१२/२०१० ) या १७ दिवसाच्या कालावधीत ग्राहकाचा वीज वापर (१११-०१) =११० युनिट,म्हणजेच १९४ युनिट प्रति माह झाल्याचे दिसुन येत आहे.

५) वरील बाबीचे निरिक्षण केल्यानंतर महावितरण कंपनीने ग्राहकास माहे ऑगष्ट २०१० मध्ये प्रथम ३५४४ युनिटची केलेली वीज आकारणी व त्यानंतर ७८३ युनिटची सुधारीत वीज आकारणी संयुक्तीक व योग्य नाही. त्याकरीता माहे ऑगस्ट २०१० पुर्वी १२ महीने झालेला ग्राहकाचा वीज वापर गृहीत धरुन त्याप्रमाणे सरासरी ३०५ युनिट प्रति माह वीज आकारणी माहे ऑगष्ट, सप्टेबर, ऑक्टोबर २०१० या महीण्याकरीत करणे योग्य होईल असे या मंचाचे मत आहे.

# आदेश

१) महाविरण कंपनीने ग्राहकास दिलेले माहे ऑगष्ट,सप्टेबर,ऑक्टोबर २०१० चे वीज देयक रद्द करण्यात येत असुन त्याऐवजी वरील कालावधीकरीता ३०५ युनिट प्रति माह प्रमाणे वीज आकारणी करुन सुधारीत वीज देयक देण्यात यावे.

२) वरील सुधारीत वीज देयकात कोणतेही व्याज व दंडाची आकारणी करु नये तसेच ग्राहकाने वरील देयकाबाबत यापुर्वी भरणा केलेल्या रक्कमेची वजावट करावी.

**वरील आदेशाचे पालन करुन त्याचा अहवाल तीस दिवसांच्या आंत मंचास सादर करावा.**

| | | |
|---|---|---|
| **प्र. अ. सगणे** | **विलासचंद्र सु. काबरा** | **व्ही. बी. मंत्री** |
| **सदस्य/सचिव** | **सदस्य** | **अध्यक्ष** |